महाराष्ट्र शासन

माहितीचा अधिकार

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र.संवैशिवसं/एमएच-सीईटी-२०१५/परिपत्रक/जावैप्र/२०१५/१-अ, दि.: १८/०६/२०१५

## परिपत्रक

## आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम - प्रवेश प्रक्रिया

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता राज्य शासनाच्या वतीने एमएच-सीईटी-२०१५ ही सामाईक प्रवेश परीक्षा दिनांक ०७ मे, २०१५ रोजी घेण्यात आली होती व सदर प्रवेश परीक्षेचा निकाल दिनांक ०५ जून, २०१५ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. एमएच-सीईटी-२०१५ च्या गुणवत्ता यादीनुसार दिनांक १८ जून, २०१५ ते २३ जून, २०१५ या कालावधीत आपल्या केंद्रांवर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता उमेदवारांच्या मूळ प्रमाणपत्रांची छाननी आणि पसंतीक्रम अर्ज भरण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सदर प्रक्रियेकरिता संवैधानिक आरक्षणाची मागणी करणाऱ्या उमेदवारांची सुध्दा प्रमाणपत्र पडताळणी करण्यात येणार आहे. सदर प्रमाणपत्रांची पडताळणी दरम्यान उमेदवाराचे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र आणि आवश्यकता असल्यास नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र उपलब्ध असणे बंधनकारक होते.

गतवर्षी पर्यंत राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागामार्फत जात वैधता प्रमाणपत्रासंबंधी परिपत्रक निर्गमित करण्यात येत होते. परंतू सन २०१५-१६ करिता समाजकल्याण विभागामार्फत अद्यापपर्यंत कोणतेही परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले नाही. गतवर्षी अनुसूचित जमाती (एस.टी.) उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्रमांक ५६७५/२०१३ व इतर याचिकांमध्ये दिनांक १६ जुलै, २०१३ रोजी दिलेल्या आदेशांमध्ये जात वैधता प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांना हमीपत्राच्या आधारावर पसंतीक्रम अर्ज भरण्यास परवानगी देण्यात आली होती.

मा.उच्च न्यालयालयाच्या उक्त आदेशांच्या धर्तीवर एमएच-सीईटी-२०१५ करिता संवैधानिक आरक्षणाची मागणी करणाऱ्या उमेदवारांकडे पसंतीक्रम अर्ज सादर करतेवेळेस जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, परंतू जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज केल्याची पावती उपलब्ध असल्यास अशा उमेदवारांना हमीपत्राच्या आधारावर पसंतीक्रम अर्ज भरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

सक्षम प्राधिकारी व संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई